| MHGA070004272019 |
|---|

| | |
|---|---|
| प्राप्त तारीख | १९.१०.२०१९ |
| नोंदणी तारीख | १९.१०.२०१९ |
| निकाल तारीख | २८.०४.२०२६ |
| कालावधी | **०६ वर्षे, ०६ महिने, ०९ दिवस** |

**भाग अ***

**(न्यायनिर्णयाचे शीर्षक पृष्ठ)**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (१)]**

**निशाणी – ६२**

**अहेरी येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, अहेरी, यांच्या न्यायालयात,**
**पिठासिन अधिकारी : एस.एम.एच.शाहिद,**

| | |
|---|---|
| पहिल्या खबरीचा तपशील | अपराध क्र. १७८/२०१९ अहेरी पोलीस ठाणे |
| न्यायनिर्णयाची तारीख | २८.०४.२०२६ |
| प्रकरण क्रमांक | **सं. फौजदारी खटला क्रमांक १३७/२०२९** |
| तक्रारकर्ता / अभियोग पक्ष | **महाराष्ट्र शासन**,<br>मार्फत/पोलीस स्टेशन अधिकारी, अहेरी, |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | **सहाय्यक सरकारी अभियोक्ता आर.एस. उंदिरवाडे** |
| आरोपीचे नाव | **१.संतोष रामय्या मुडसवार,**<br>वय अंदाजे २३ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>**२. महेश मधुकर भिमोजवार,**<br>वय अंदाजे २३ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>**३. तिरूपती राजय्या बोमनवार,**<br>वय अंदाजे २२ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>**४. प्रकाश लक्ष्मण सिंगनेर,**<br>वय अंदाजे २२ वर्षे, व्यवसाय मजुरी,<br>सर्व राहणार– आलापल्ली, ता. अहेरी, जिल्हा– गडचिरोली. |
| तर्फे प्रतिनिधीत्व करणार | आरोपी करीता श्री.जैनवार<br>(बचाव पक्षातर्फे सुविद्य विधीज्ञ) |

* दि. १४.०७.२०२२ रोजी प्रकाशित राजपत्र क्र. ०८०१/२०२२ नुसारच्या नमुन्यात.

**भाग ब***

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (२)]**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | २२.०८.२०१९ |
| पहिल्या खबरीची तारीख | २२.०८.२०१९ |
| अंतिम अहवाल दाखल तारीख | १९.१०.२०१९ |
| दोषारोपनिश्चितीची तारीख | १४.१२.२०२१ |
| पुराव्याला सुरुवात झाल्याची तारीख | १३.०३.२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी नेमल्याची तारीख | २८.०४.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २८.०४.२०२६ |
| शिक्षा झाली असल्यास ती तारीख | – |

## आरोपीबाबत तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | संपरिक्षीत गुन्हे | दोषसिद्ध की निर्दोष मुक्त | दिलेली शिक्षा | फौ.प्र.संहिता कलम ४२८ नुसार अभिरक्षेत घालविलेला कालावधी. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | संतोष रामय्या मुडसवार, | -- | १९.१०.२०१९ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(अ),८३ प्रमाणे दंडनिय | **निर्दोष** | – | – |
| २. | महेश मधुकर भिमोजवार | -- | १९.१०.२०१९ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(अ),८३ प्रमाणे दंडनिय | **निर्दोष** | – | – |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ३. | तिरूपती राजय्या बोमनवार, | -- | १९.१०.२०१९ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(अ),८३ प्रमाणे दंडनिय | **निर्दोष** | – | – |
| ४. | प्रकाश लक्ष्मण सिंगनेर, | -- | १९.१०.२०१९ | महाराष्ट्र दारु प्रतिबंध अधिनियम, १९४९ च्या कलम ६५(अ),८३ प्रमाणे दंडनिय | **निर्दोष** | – | – |

| **या न्यायनिर्णयात वापरलेल्या संक्षेपार्थी शब्दांचा तपशील** | |
|---|---|
| फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ | **फौजदारी संहिता** |
| महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ | **दारुबंदी अधिनियम** |

**भाग क**

**[फौजदारी नियमावली च्या सहाव्या प्रकरणातील परिच्छेद क्र. ४४ (३)]**

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने बोलविलेल्या साक्षीदारांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| **क्रमांक** | **नांव** | **पुराव्याचा प्रकार** |
|---|---|---|
| सा.क्र. १ | रविंद्र बालाजी चौधरी (**निशाणी ३२ खाली**) | फिर्यादी |
| सा.क्र. २ | धर्मेंद्र गणपत रामटेके (**निशाणी ४२ खाली**) | नमुना वाहक |
| सा.क्र. ३ | धनराज नारायण दुर्गे (**निशाणी ४७ खाली**) | पंचसाक्षीदार |
| सा.क्र. ४ | अजय वसंतराव तेलंगे (**निशाणी ५२ खाली**) | साक्षीदार |

**अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालयाने दिलेल्या निशाणीबद्ध दस्तांची यादी**

**अ. <u>अभियोग पक्ष</u>:**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी **पी–३३**/स.सा.क्र.०१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | निशाणी **पी–३४**/स.सा.क्र.०१ | मालमत्ता शोध नमुना |
| ३. | निशाणी **पी–३५**/स.सा.क्र.०१ | सि.ए.फार्म |
| ४. | निशाणी **पी–३६**/स.सा.क्र.०१ | फिर्याद |
| ३. | निशाणी **पी–३७**/स.सा.क्र.०१ | छापिल प्रथम खबर |

**ड. <u>महत्त्वाच्या वस्तु</u> :**

| अ.क्र. | महत्त्वाची वस्तु क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | १७८/२०१९ | इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या ३७५ मिली मापाचया ८० निपा |

## <u>न्यायनिर्णय</u>

(दिनांकः २८ एप्रिल, २०२६)

१. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की, दिनांक २२/०८/२०१९ रोजी सकाळी अंदाजे ०६.४५ ते ०७.४५ वाजताचे दरम्यान मौजा वांगेपल्ली नदीघाट येथे आरोपीच्या मोटारसायकलची पहाणी केली असता इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या ३७५ मिली मापाच्या ८० निपा बेकायदेशिरपणे विनापरवाना वाहतुक करित असतांना मिळून आले. आरोपीचा गुन्हा सिध्द होण्याकरिता खालील मुद्दे उपस्थित होतात. त्याकरिताचे माझे निष्कर्ष कारणांसह खालीलप्रमाणे नमूद केले आहे. आरोपीविरुध्द पुरावा असल्याने तिची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.क्र.२३ खाली मागेच नोंदविण्यात आले. आरोपींचा बचाव पुर्णपणे नकारात्मक आहे.

| | **<u>मुद्दे</u>** | **<u>निष्कर्ष</u>** |
|---|---|---|
| १ | दि.२२/०८/२०१९ रोजी सकाळी अंदाजे ०६.४५ ते ०७.४५ वाजताचे दरम्यान मौजा वांगेपल्ली नदीघाट येथे आरोपीच्या वाहनाची पहाणी केली असता इंम्पेरिअल ब्ल्यु कंपनीच्या ३७५ मिली मापाच्या ८० निपा बेकायदेशिरपणे विनापरवाना वाहतुक करित असतांना मिळून आल्याचे अभियोगपक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |

२ आदेश ? आरोपीची निर्दोष मुक्तता करण्यांत आली.

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ करिताः**

२. आरोपीचा गुन्हा सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षाने केवळ ०४ साक्षीदार तपासला.

३. सा.क्र.१ **रविंद्र बालाजी चौधरी** (फिर्यादी) यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, ते आरोपीला ओळखतात. दि.२२.०८.२०१९ रोजी ते पोलीस स्टेशन अहेरी येथे कार्यरत होते, त्यादिवशी मुखबीव्दारे खबर मिळाली की, मौजा वांगेपल्ली नदीघाट येथे आरोपी दारूची वाहतुक करित आहे. त्यावरून ते व पोलीस स्टॉफसह व पंचासह गेले. तेथे आरोपीच्या ताब्यात आयबी कंपनीच्या ३७५ एम एली मापाच्या एकूण ८० बाटल्या व त्यात दाय मिळून आली. त्यापैकी प्रत्येकी एक–एक बॉटल सिए, परक्षिणाकरीता मुकरर केले. त्यानंतर त्यांनी दिसत्या घटनास्थळाचा पंचनामा नि.क्र.३३ तयार केला. मालमत्ता शोध जप्तीचा नमुना नि.क्र. ३४ व सि.ए.फार्म नि.क्र.३५ तयार केला होता. त्यावर त्यांची पंचांची सही असून मजकुर बरोबर आहे. त्यानंतर मुददेमाल व आरोपीसहीत पो. स्टेशन येथे आणला व आरोपीविरूध्द लेखी फिर्याद नि.क्र.३६ व प्रथम छापील खबर नि.क्र.३७ दाखविण्यात आली. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी विचारलेल्या सुचक प्रश्नांना त्यांनी नकारार्थी उत्तर दिले.

४. सा.क्र.२ **धमेंद्र रामटेके, नमुना वाहक** यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.२८.०५.२०१९ रोजी ते अहेरी पोलीस ठाण्यात कार्यरत होते. त्यांना अपराध क्र.१७८/२०१९ चा सि.ए.मुददेमाल कामी नागपुर येथे दाखल करण्याकरिता त्यांची डयुटी लागली होत. दि.१०.०९.२०१९ रोजी मुददेमाल नागपुर येथे जमा केल्यानंतर पोचपावतीलसह पोलीस स्टेशनला जमा केला. तपासी अधिकारी श्री ताराचंद अलोणे होते. त्यांनी बयाण नोंदविले. त्यांना पोच पावती नि.क्र.४३ दाखविली. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांना शासकीय कामाकरिता बाहेर जाण्याकरिता वॉरंट मिळते. वांरटची एक प्रत पोलीस स्टेशनला जमा करावी लागते व दुसरी प्रत बस कंडॅक्टरला दयावी लागते. इतर सुचक प्रश्ने नाकारली.

५. सा.क्र.३ **धनराज नारायण दुर्गे** यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.२२.०८.२०१९ रोजी त्यांना पोलीस स्टेशनला पंच म्हणुन बोलाविले होते. त्यांना घटनास्थळ जपती पंचनामा नि.क्र.३३ व मालमत्ता शोध जप्तीचा नमुना नि.क्र.३४ वरिल सही मानय केली. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांना ते पोलीस स्टेशनला कम्पुटर ऑपरेटरचे काम करित होता. त्याला पोलीस स्टेशनकडून पगार मिळत होता. त्याने पोलीसांच्या सांगण्यावरून पंचनाम्यावर सहया केल्या. इतर सुचक प्रश्ने नाकारली.

६. सा.क्र.४ **अजय वसंतराव तेलंगे** यांनी त्यांच्या पुराव्यात असे कथन केले की, दि.२२.०८.२०१९ रोजी त्यांना पोलीस स्टेशनला कार्यरत असतांना त्यांना माहिती मिळाली की, मौजा वांगेपल्ली नदीधाटावर तीन दुचाकी वाहन येतांना दिसले. त्या वाहनांना थांबवून त्या वाहनावरिल लोकांची झडती घेतली असता आरोपींच्या ताब्यातुन पलास्टीकची तीन चुंगडीमध्ये प्रतयेकी ईम्पेरिअल ब्ल्यु कंपनीचे ३७५ मिली मापाचे ४० सिलबंद निपा मिळूनआल्या. त्यापैकी प्रत्येकी एक बॉटल सि.ए.करिता वेगळी काढली. जप्त मुददेमाल पोलीस सटेशला जमा केला. पोलीसांनी त्यांचे बयाण नोंदविले. आरोपीतर्फे घेण्यात आलेल्या उलटतपासात त्यांनी इतर सुचक प्रश्ने नाकारली.

७. सरकारी अभियोक्ता तसेच आरोपीतर्फे युक्तिवाद ऐकण्यात आला. तसेच दस्तऐवज व पुराव्याचे अवलोकन केले.

८. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदर प्रकरणात अभियोग पक्षाने चार साक्षीदार तपासले. पंच साक्षदार हा पोलीस स्टेशनमध्ये काम करतो असे त्याने आपल्या उलटतपासात मान्य केले आहे. त्यामुळे त्याची साक्ष विश्वासार्ह ठेवणे उचित होणार नाही. ईतर साक्षीदार फिर्यादी हे पोलिस साक्षीदार आहे. महत्वाचे म्हणजे तपासी अधिकारी यांची साक्ष नोदंविण्यात आली नाही. जोपर्यंत तपासी अधिकारी व ईतर स्वतंत्र साक्षीदार यांची साक्ष नोंदविली जाणार नाही तोपर्यत आरोपीस दोषी ठरविणे उचित होणार नाही. सदर प्रकरणात जप्त केलेले द्रव्य दारु असल्याबाबतचा दर्शविणारा निर्णायक पुरावा म्हणून रासायनिक पृथःकरण अहवाल अभियोगपक्षाने न्यायालयासमोर सादर केला. परंतु, आरोपीविरुध्द सबळ व सुसंगत पुरावा नसल्यामुळे तसेच अभियोगपक्ष आरोपीविरुध्द सदरचा गुन्हा संशयाचे पलिकडे सिध्द करण्यास असमर्थ ठरला आहे. म्हणुन आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द होवू शकत नाही. सबब, आरोपी हे सदर प्रकरणातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे, या

निष्कर्षाप्रत मी येतो. म्हणून मी मुद्दा क्र.१ ला नकारार्थी उत्तर देतो.

**<u>मुद्दा क्र. २ करिताः</u>**

९. वर चर्चा केल्याप्रमाणे आणि अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचा गुन्हा सिध्द न केल्याने सदर गुन्हयातून त्यांना निर्दोष मुक्त करणे मला न्यायोचित वाटते. सदर प्रकरणात जप्त दुचाकी वाहन क्र.एम.एच.३३.एच.४३८२ सुप्रतनाम्यावर सोडण्यात आली आहे. परंतु बिना नंबरची होंडा ड्रीम युग मोटारसायकल पोलीस स्टेशनला जमा असून त्यावर आरोपीने हक्क दाखविलेला नाही. पुढे असे आहे की, आरोपींचे बचाव पुर्णपणे नकारार्थी असल्याने बिना नंबरची होंडा ड्रीम युग मोटारसायकल आरोपीला परत करणे न्यायोचित ठरणार नाही. सबब, त्याबाबतचे आदेश पारित करणे योग्य होईल. म्हणून, मुद्दा क्र.२ चे उत्तरार्थ खालील आदेश पारित करतो.

## <u>आदेश</u>

१. आरोपी **क्र.१ ते ४ यांनी** फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये मुंबई दारुबंदी कायद्याचे कलम ६५(अ),८३ नुसार दंडनिय अपराधातून निर्दोष ठरवून मुक्त करण्यांत येते.

२. आरोपींचे जामीनपत्र रद्द करुन जामीनदाराला मुक्त करण्यांत येते.

३. आरोपींनी फौ.प्र.सं. कलम ४३७–अ अंतर्गत वरिष्ठ न्यायालयात अपिल करिता हजर राहण्याकामी प्रत्येकी रूपये २५,०००/– प्रत्येकीचा जामीन दाखल करावा.

४. फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ४५२ नुसार असे आदेशित करण्यात येते की, मुददेमाल अपिल कालावधीनंतर यातील जप्त असलेल्या मुद्देमालाची विल्हेवाट राज्य उत्पादन शुल्क विभाग गडचिरोली यांनी लावावी.

५. जप्त दुचाकी वाहन क्र.एम.एच.३३.एच.४३८२ अपील कालावधी संपल्यानंतर वाहनाचा ताबा मुळ मालकाकडे कायम ठेवण्यात येईल.

६. जप्त बिना नंबरची होंडा ड्रीम युग मोटारसायकल अपील कालावधी संपल्यानंतर वाहनाचा लिलाव करून त्याची रक्कम सरकार जमा करण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर.)

Digitally signed by SAJIDUZZAMAN SHAHID
Date: 2026.04.28 17:39:05 +0530

**(एस.एम.एच.शाहिद)**

दि.२८.०४.२०२६. न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अहेरी